# महात्मा गांधी

## एक बहुआयामी व्यक्तिमत्व



प्राचार्य डॉ. जे. पी. शर्मा
प्रा. विनोद एन. रामटेके
डॉ. संदीप एस. साळुंके

G. S. College of Commerce & Economics
NAGPUR

# महात्मा गांधी : एक बहुआयामी व्यक्तिमत्व

संपादक
प्राचार्य डॉ. जे. बी. अंजने
प्रा. व्ही. एन. रामटेके
प्रा. डॉ. एस. एस. साळुंके

9 788194 736400

महाविद्यालय प्रकाशन क्र. ०५

ISBN NO.978-81-947364-0-0

DDC Number : 923.254

प्रकाशक: डॉ. जे. बी. अंजने
प्राचार्य, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

प्रकाशन स्थळ: ऐनपूर ता. रावेर, जि. जळगाव, [महाराष्ट्र] पिन. ४२५५०७

मुखपृष्ठ:डॉ. संदीप एस. साळुंके

अक्षरजुळणी व मुद्रण:प्रकाशन विभाग, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर

वर्ष : नोव्हेंबर, २०२१

मूल्य: विनामूल्य

© प्राचार्य, स.व.प. कला व विज्ञान महाविद्यालय, ऐनपूर
ईमेल: svpca123@yahoo.com, svpca.librarian@gmail.com
संकेतस्थळ: http://ainpurcollege.org/

- या ई-ग्रंथात प्रकाशित झालेल्या लेखातील मतं हि ज्या त्या लेखकांची आहेत. त्यांच्याशी प्रकाशक, संपादक सहमत असतीलच असे नाही.
- या कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर, इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी- फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

G. S. College of Commerce & Economics
NAG

# महात्मा गांधी : एक बहुआयामी व्यक्तिमत्व

| Sr.No. | Chapter Title | Author |
|---|---|---|
| 1 | गांधीजी समजून घेताना ! | प्रा. अक्षय रविंद्र महाजन |
| 2 | महात्मा गांधींचे राष्ट्रीय एकात्मता संदर्भातील विचार | डॉ.मिलिंदकुमार भिकाजी टेंवरे |
| 3 | महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार | प्रा.देविदास भदू भाले |
| 4 | राष्ट्रपिता महात्मा गांधीजी : प्रभावशाली व्यक्तिमत्व व मतिमान नेतृत्व | डॉ. महेश दिलीप थोटे |
| 5 | २० व्या शतकातील महान विभूती : राष्ट्रपिता महात्मा गांधी | डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी |
| 6 | गांधीजींची पत्रकारिता | प्रा. डॉ. जगदीश भगवान खराट |
| 7 | गांधीवाद | प्रा. डॉ. जगदीश भगवान खराट |
| 8 | महात्मा गांधीजींचे सामाजिक कार्य | डॉ. देवयानी चव्हाण |
| 9 | महात्मा गांधींच्या शैक्षणिक विचारांचे ऐतिहासिक अध्ययन | डॉ. विलास भा. करकाडे |
| 10 | महात्मा गांधीजींचे तत्त्व व कार्यपद्धती- एक अभ्यास | प्रा.प्रदीप नामदेव तायडे., प्राचार्य डॉ. जे. डी. अंजने |
| 11 | महात्मा गांधी : सत्य, अहिंसा, सत्याग्रह एवं गांधी विचारों की प्रासंगिकता | प्रा- डॉ- संजय वामनराव भोले |
| 12 | राष्ट्रपिता महात्मा गांधी के आर्थिक विचारों की वर्तमान युग में प्रासंगिकता | डॉ. नेहा कल्याणी |
| 13 | Social Work of Mahatma Gandhi | Dr.Priya Narendra Kurkure |
| 14 | Bapu Kuti (Sevagram Ashram) : Inspiration Place | Mahadev C. Chunche |
| 15 | Basic Education: The Gandhian Approach to Self Dependance and Self Awareness | Dr. B.J. Mundhe |
| 16 | Moral and Spiritual Education: The Gandhian View Points | Dr. B.J. Mundhe |
| 17 | FUNDAMENTAL CONCEPTS OF GANDHIJI AND ITS RELEVANCE IN CONTEMPORARY INDIAN SOCIETY | Prof Swati Sagar Kathaley |
| 18 | महात्मा गांधीजी का मिट्टी, पानी का प्रयोग और इंडियन ओपिनियन में पत्रकारिता पर एक मानसशास्त्रीय अध्ययन | प्रा व्ही.एन.रामटेके |
| 19 | गांधी दर्शन और आदर्श व्यक्तित्व | डॉ. जगदीश पी. ढकोरा |

G. S. College of Commerce & Economics
NAGPUR

8

# महात्मा गांधीजींचे सामाजिक कार्य

लेखक :- डॉ. देवयानी चव्हाण

**प्रस्तावना:-**

अहिंसात्मक मार्गाने स्वातंत्र्य मिळविणारे आणि संपूर्ण जगाला प्रेरित करणारे महान तत्त्वज्ञ महात्मा गांधी समाजसुधारक, समाजसेवक, विश्वमानव आणि राष्ट्रनिर्माता होते. रवींद्रनाथ टागोर यांनी सर्वप्रथम त्यांना महात्मा(महान आत्मा) ही उपाधी दिली. तर सुभाषचन्द्र बोस यांनी इ.स.१९४४ मध्ये पहिल्यांदा त्यांना राष्ट्रपिता असे संबोधले. असहकार आणि अहिंसेच्या तत्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधींनी प्रथम दक्षिण आफ्रिकेमध्ये, तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. इ. स. १९१५ मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी चंपारणमधील शेतकऱ्यांना जुलमी कर व जमीनदार यांच्या विरुद्ध लढण्यासाठी एकत्र केले. इ. स. १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन,स्त्रियांचे समान हक्क, सर्व धर्म समभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वात महत्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. गांधी आजीवन साम्प्रदायीकतावादाचे विरोधक होते आणि ते मोठ्या प्रमाणात सर्व धर्म आणि पंथ यांच्यापर्यंत पोहचले. ढासळत जाणाऱ्या खिलाफत चळवळीला त्यांनी आधार दिला आणि ते मुस्लिमांचे नेते बनले. इ. स. १९३० मध्ये इंग्रजांनी लादलेल्या मिठावरील कराविरोधात त्यांनी हजारो भारतीयांचे दांडी यात्रेमध्ये प्रतिनिधित्व केले. इ. स. १९४२ मध्ये त्यांनी इंग्रजांविरुद्ध भारत छोडो आंदोलन चालू केले. या आणि यासारख्या इतर कारणांसाठी त्यांना भारतात तसेच दक्षिण आफ्रिकेत अनेकदा तुरुंगात टाकण्यात आले. सत्य आणि अहिंसा या तत्वांनुसार ते स्वतः जगले आणि इतरांनाही तसे करण्यासाठी प्रवृत्त केले. खेडी समृध्द झाली तरच देशाचा विकास होईल असे त्यांचे ठाम मत होते. म्हणून त्यांनी 'खेड्याकडे चला' हा नारा दिला. अनेकदा आत्मशुद्धीसाठी आणि राजकीय चळवळीसाठी साधन म्हणून दीर्घ उपवास केले. भारत पाकिस्तान फाळणीमुळे गांधीजी व्यथीत झाले आणि हिंदुमुस्लीम दंगे थांबविण्यासाठी प्रयत्न केले.

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत संशोधन शोधनिबंधासाठी निरीक्षणात्मक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. यात तथ्य संकलनासाठी विविध दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला असून यात विविध संदर्भ ग्रंथ, मासिके व वर्तमानपत्रांचा उपयोग करण्यात आला आहे.

## अध्ययनाचे उद्देश

महात्मा गांधी यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे.

## आशय विश्लेषण

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी एक समाजसुधारक आणि समाजसेवक म्हणून जे कार्य केले, त्यासंबंधिचे विचार याविषयी पुढीलप्रमाणे आढावा घेता येईल.

### १) अस्पृश्यता निवारण

हिंदू धर्मांतर्गत हा कलंक व शाप नाहीसा करण्यासाठी महात्मा गांधीनी अथक परिश्रम घेतले. पुणे करारानंतर ३० सप्टेंबर रोजी हिंदू पुढाऱ्यांची बैठक झाली. मुंबईत झालेल्या या बैठकीत अस्पृश्यता निर्मूलन करण्यासाठी सार्वजनिक विहीर, तलाव, धर्मशाळा,रस्ते,शाळा,स्मशाने,मंदिरे इत्यादी अस्पृश्यांसाठी खुली करण्यात यावीत असे ठरले. परंतु ही पुरेशी नसल्यामुळे गांधीजींचे समाधान झाले नाही. अस्पृश्यता निर्मूलनासाठी आणखी जोरकस प्रयत्न व्हायला हवेत,असे त्यांना वाटू लागले. गांधीजींनी आपल्या आश्रमात सर्व जाती -जमातींच्या स्त्री-पुरुषांनी एका पंगतीला बसावे असा प्रघात त्यांनी रुढ केला. १९३३ पासून त्यांनी असेही बंधन घालून घेतले की, ज्या लग्नात वर किंवा वधू यापैकी एक जण दलित नसेल, अशा विवाहाला जायचे नाही. तो नियम त्यांनी इतक्या काटेकोरपणे पाळला की, त्यांचे सचिव महादेव देसाई यांच्या नारायण ह्या मुलाच्या विवाहाला केवळ तेवढ्या कारणानेच गांधी हजर राहिले नाही. प्रत्येक सवर्ण हिंदूने हरिजनांचे दुःख हे आपले दुःख आहे असे समजून, ते जे समाजापासून दूर फेकले गेले आहेत अशा त्यांच्या भयानक परिस्थितीत त्यांच्याशी मैत्री केली पाहिजे.

### २) चंपारण्य सत्याग्रह

सन १९१७ साली बिहारमधील चंपारण्य येथील शेतकऱ्यांवर इंग्रज मळेदाराकडूननीळ पिकविण्याची सक्ती केली जात असे आणि त्यांना मोजक्याच भावात ते इंग्रजांना विकावे लागत असे. परिणामी त्यांना योग्य तो मोबदला मिळत नव्हता. शिवाय शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागत असे. इंग्रजांच्या या मक्तेदारीला आळा घालण्यासाठी सन १९१७ साली बापू चंपारण्याला गेले. तेथल जनतेला एकत्रित करून अहिंसेच्या मार्गाने आंदोलन करून न्याय मिळवून दिला. त्याचा भारतातील अहिंसेचा पहिला प्रयोग यशस्वी झाला.

### ३) दारूबंदी

आपले ध्येय अहिंसक प्रयत्नांनी गाठावयाचे असेल तर दारू, अफू इत्यादी मादक पदार्थांच्या व्यसनामुळे जे लाखो स्त्री- पुरुष गांजले जात आहे त्यांचे भवितव्य भावी सरकारवर सोडता येणार नाही असे गांधीजींना वाटते. दारूबाज व अफूबाज यांना व्यसनापासून सोडविण्याची कामगिरी गांधीजींनी वैद्य



G. S. College of Commerce & Economics NAGPUR

आणि डॉक्टरांनवर सोपविली.स्वतनी लोकांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी विद्यार्थी आणि स्त्रिया यांना प्रोत्साहित केले आणि दारूबंदी करण्यास भाग पाडले.

३)खेडा सत्याग्रह

सन १९१८ साली गुजरात मधील खेडा या गावात सतत पडलेल्या पावसामुळे दुष्काळग्रस्त झाले,तेथील पिकांची अवस्था फारच वाईट होती. अशी परिस्थिती असताना सुद्धा इंग्रज सरकार शेतकऱ्यांकडून सक्तीने शेतसारा वसूल करीत असत. परिणामी तेथील शेतकऱ्यांची परिस्थिती खूप वाईट बनली. महात्मा गांधीनी त्या ठिकाणी एक आश्रम उभारला आणि आपल्या लहान-मोठ्या सर्व अनुयायांना एकत्र केले. गावातील सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना आपल्या विश्वासात घेतले. शेतकऱ्यांना गांधीजींनी शेतसारा न भरण्याचा आदेश दिला, तेव्हा सन १९१८ साली शेतकऱ्यांनी शेतसारा बंदीची चळवळ सुरु केली आणि महात्मा गांधींना त्या चळवळीचे अध्यक्ष बनवले. गांधीजींच्या नेतृत्वाखाली सरदार पटेल यांनी शेतकऱ्यांच्या समस्येसंबंधी इंग्रज सरकार सोबत चर्चा केली. ब्रिटिश सरकारने त्यांची मागणी मान्य करून सर्व कैद्यांची सुटका केली.अशा प्रकारे महात्मा गांधी यांची प्रसिद्धी संपूर्ण जगभर पसरली.

४) दांडी यात्रा

इंग्रज सरकारने मिठावर कर लावल्याने त्याचा बोजा गरीब जनतेवर पडत होता. समुद्रात मीठ तयार करण्याचा भारतीयांना पूर्ण अधिकार आहे. त्यावर इंग्रज सरकारला पायाबंदी करण्याचा कोणत्याच प्रकारचा अधिकार नाही. हे कार्य पूर्ण करण्यासाठी महात्मा गांधी यांनी १२ मार्च १९३० साली साबरमती आश्रमातून दांडी यात्रेला सुरुवात केली. अनेक लोक त्यात सहभागी झाले. सहा एप्रिलच्या पहाटे महात्मा गांधी यांनी समुद्र किनाऱ्यांकडे चालत गेले आणि मिठाचा खडा उचलून इंग्रज सरकारने लावलेला मिठाचा कायदा मोडून काढला याप्रकरणी त्यांना पकडून कैद करण्यात आली, त्यामुळे संपूर्ण देशात हिंसात्मक आंदोलनाला सुरुवात झाली.

## अहमदाबाद येथील कामगार लढा

१९१४ साली झालेल्या पहिल्या युद्धानंतर देशात खूप महागाई वाढली. अहमदाबाद येथील कामगारांनी वेतनासाठी गिरणी मालकांकडे विनंती केली परंतु त्यांची मागणी मान्य करण्यात आली नाही. गांधीजींनी त्या ठिकाणी स्वतः जाऊन संप पुकारला व उपोषणाला बसले. कामगार देखील गांधीजींसोबत उपोषणाला बसले. गांधीजींच्या अहिंसावादी आंदोलनासमोर गिरणी मालकांनी हार पत्करली व कामगारांना वेतन वाढ दिली.



G. S. College of Commerce & Economics NAGPUR

## भारत छोडो चळवळ

दुसऱ्या महायुद्धाच्या दरम्यान इंग्रज सरकारने भारतीय प्रतिनिधींना न जुमानता भारतीय नागरिकांना जबरदस्तीने युद्धात खेचले. दुसरे महायुद्ध हे लोकशाही करिता झालेले सर्वात मोठे युद्ध होते, परंतु हे युद्ध जरी लोकशाहीविरोधी असले तरी सुद्धा इंग्रज सरकार आपल्याला स्वातंत्र्य देणार नाही हे गांधीजींना माहित होते, कारण इंग्रज सरकारने अशा प्रकारचे कोणतेच आश्वासन दिले नव्हते. इंग्रज सरकार युद्धात व्यस्त असल्याचे हेरून गांधी यांनी १९४२ साली 'भारत छोडो' हे आंदोलन सुरू केले. या आंदोलनातील सहभागी असणाऱ्या लाखो लोकांना इंग्रज सरकारने तुरुंगात टाकले. हजारो आंदोलकांवर गोळीबार करण्यात आला. गांधीजींनी इंग्रजांना स्पष्ट सांगितले की या चळवळीला हिंसक वळण जरी लागले तरी ही चळवळ थांबणार नाही. गांधीजींनी जनतेला "करा किंवा मारा" असा मूलमंत्र दिला. भारत छोडो चळवळ देशभर पसरली असताना ९ ऑगस्ट १९४२ साली महात्मा गांधी आणि त्यांच्या राष्ट्रीय काँग्रेसच्या सदस्यांना मुंबईमध्ये अटक करण्यात आली. 'भारत छोडो' या चळवळीला मोठ्या प्रमाणात यश आले नसले तरी त्या माध्यमातून देशभरातील जनतेला गांधीजींनी एकत्र आणले.

## स्त्रियांसाठी कार्य

गांधीजींनी स्त्रियांच्या सेवेचा विधायक कार्यक्रमात समावेश केला. सत्याग्रहाने हिंदुस्थानातील स्त्रियांना अंधकाराने ग्रासले होते. त्यांना बाहेर काढण्याचे काम गांधीजींनी स्वराज्याच्या लढ्यात स्त्रियांना बरोबरीने भाग घेण्यास प्रवृत्त करून केले. स्त्री ही पुरुषाची मदतनीस आहे. खांद्याला खांदा लावून ती काम करू शकते ही जाणीव समाजात निर्माण केली. ज्या रूढी व कायदे पुरुषांनी घडविले होते व जे घडवण्यात स्त्रियांना सहभाग नव्हता अशा रूढी व कायद्यांमध्ये बदल करण्यात आले. बायका म्हणजे बाहुल्या किंवा उपभोग्य वस्तू आहेत असे न समजता त्या सेवेच्या समान क्षेत्रात सन्माननीय सहकारी आहेत ही भूमिका मांडली आणि त्यासाठी जोरकस प्रयत्न केले. राष्ट्रीय चळवळीच्या सुरुवातीच्या दिवसातच गांधीजींनी जाहीर केले की जोपर्यंत स्त्रिया सार्वजनिक आयुष्यात भाग घेऊन त्याचे शुद्धीकरण करीत नाहीत तोपर्यंत आपल्याला स्वातंत्र्य मिळणे कठीण आहे आणि जरी ते मिळालेच तरी त्यात स्त्रियांचा संपूर्ण सहभाग नाही असे स्वातंत्र्य मी कुचकामी मानतो.

## आरोग्य आणि स्वच्छतेचे शिक्षण

निरोगी शरीरात निरोगी मन वास करते हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. लोकांच्या शरीराला कुरतडून खाणारे दारिद्र्य आहे यात तिळमात्र शंका नाही, परंतु लोकांना जर आरोग्य व स्वच्छतेच्या बाबतीत योग्य शिक्षण दिले तर ते प्रमाण बरेच कमी करता येईल म्हणून त्यांनी लोकांमध्ये जागृती घडवून आणली.



G. S. College of Commerce & Economics NAGPUR

आपल्या मानव बांधवांच्या सेवेसाठी जगण्याकरिता खा. स्वतःहाच्या स्वाद तृप्तीसाठी खाऊन जगू नका. तुमचे मन व शरीर यांना सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक असेल इतकाच आहार घ्या. मनुष्य जशा प्रकारचा आहार घेतो तसा तो होतो हा संदेश त्यांनी दिला.

## ग्रामविकास व ग्राम व्यवस्थापन

ग्रामीण विकासाच्या संकल्पनेत आर्थिक व सामाजिक पायाभूत सोयीसुविधांची उपलब्धता होणे त्यांनी आवश्यक मानले. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, आरोग्य, शिक्षण, विजेची उपलब्धता या गरजांची पूर्तता होण्यासाठी ग्रामीण भागाच्या नियोजनबद्ध विकासाचा मार्ग त्यांनी सांगितला. यासाठी स्थानिक लोकांचा विकास कार्यात सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे हे लोकांना पटवून दिले. १ मे १९६३ पासून पंचायत राज्यव्यवस्था अस्तित्वात आली. महाराष्ट्रात आणि स्थानिक स्वराज्य संस्थात स्त्रियांना ५० टक्के प्रतिनिधित्व दिले. गांधीजी म्हणत "आधी खेडी समृद्ध करा म्हणजे देश आपोआप समृद्ध होईल" गांधींचे हे तत्वज्ञान भारतासाठीच नव्हे तर जगातील सर्व विकसनशील देशांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरले.

## शिक्षणाच्या क्षेत्रात व्यापक सुधार

गांधीजींनी शिक्षणक्षेत्रात सुधार घडवून आणण्यासाठी व्यापक योजना आखल्या, राबवल्या. हिंदुस्तान हा इंग्रजांच्या टाचेखाली नव्हे, तर आधुनिक सभ्यतेच्या टाचेखाली चिरडला जात आहे, असे गांधीजींचे मत होते, त्यामुळे या सभ्यतेपासून अथवा जीवनदृष्टीपासून मुक्ती मिळविणे हे स्वराज्याचे एक मुख्य ध्येय होते. जगातील कुठलीही शिक्षणपद्धती खऱ्या अर्थाने तटस्थ नसते असे जे पाव्लो फ्रीरने आपल्या "पेडगागाजी आफ दि आप्रेस्ट" या पुस्तकात म्हटले आहे, ती गोष्ट गांधीजींनी फार पूर्वीच ओळखली होती म्हणून प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले पाहिजे यावर गांधीजींनी भर दिला.

## समारोप

महात्मा गांधी यांचे सामाजिक कार्य आजच्या समाजाला दिशा देणारे, प्रेरक आणि समाजातील मूल्यांची जपणूक करणारे आहेत. महात्मा गांधी यांनी सर्वोदयाची संकल्पना आजही भारत स्वतंत्र होऊनही ७५ वर्षानंतरही मोलाचे मार्गदर्शन करणारी ठरत आहे.



G. S. College of Commerce & Economics NAGPUR

**संदर्भ ग्रंथ:**


१ महात्मा गांधी विचार संग्रह- महात्मा गांधी

२ गांधी जसे पाहिले जाणले विनोबांनी -संपादन कांती शाह

३ संस्कार शिदोरी राष्ट्रपिता महात्मा गांधी- अनिल शोडबोले

४ महात्मा गांधींचे हिंदस्वराज्य आणि नवे मन्वंतर- सु. श्री. पांढरीपांडे

५ गांधीजींचे असामान्य नेतृत्व- अनुवाद सुजाता गोडबोले

६ महात्मा गांधी और उनकी विचारधारा -जे.आर. बोंगदालकर

७ बुनियादी शिक्षा -महात्मा गांधी